बुधवार, दि १६ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ६ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# दिवाळीनंतर निवडणुकीचे फटाके फुटणार! महाराष्ट्रात एकाच टप्प्यात निवडणुका

## २० नोव्हेंबर रोजी मतदान, २३ला मतमोजणी; मुख्य निवडणुक आयुक्त यांची पत्रकार परिषदेत माहिती

**नवी दिल्ली -** महाराष्ट्र राज्यात एकाच टप्प्यात निवडणुका होणार असल्याची घोषणा मुख्य निवडणुक आयोगाने नवी दिल्ली येथे मंगळवार (दि १५) आयोजित पत्रकार परिषदेत केली. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार असल्याचे निवडणुक आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितले.

निवडणुक आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, आम्ही काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राचा दौरा केला होता. त्या दौऱ्यादरम्यान आम्ही निवडणुकीची तयारी योग्य प्रकारे झाली आहे की नाही? याची माहिती आम्ही घेतली. लोकसभा निवडणुकीच्या वेळी काही गोष्टी घडल्या होत्या त्या टाळण्यासाठी आम्ही आता पूर्णपणे प्रयत्न करत आहोत. लोकांची मतदानासाठी रांग लागते त्यावेळी काही अंतरावर खुर्ची किंवा बाक रचण्याचा सल्ला आम्ही दिला आहे. ८५ वर्षे आणि त्यावरच्या मतदारांना घरुन मतदान करता येणार आहे. तसंच या मतदारांच्या गोपनीयतेची काळजी आम्ही घेऊ त्यासंदर्भातली पूर्ण व्यवस्था आम्ही केली आहे असंही राजीव कुमार यांनी स्पष्ट केले आहे.

गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना त्यांची पार्श्वभूमी तीनवेळा वृत्तपत्रात द्यावी लागेल. आम्ही जेव्हा महाराष्ट्रात बैठका घेतल्या तेव्हा आम्ही त्यासंदर्भातले कठोर निर्देश आम्ही राज्य निवडणूक आयोग आणि इतर अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव आहे. त्यात सर्व मतदारांचा सहभाग आवश्यक आहे.

महाराष्ट्रात एका टप्प्यात निवडणूक घेतली जाणार आहे. २० नोव्हेंबरला एका टप्प्यात निवडणूक घेतली जाणार आहेत. तर २३ नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी ही माहिती दिली आहे. गॅझेट नोटिफिकेशनची तारीख २२ ऑक्टोबर असेल तर २९ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख असेल. ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी केली जाणार आहे. तर अर्ज मागे घेण्याची तारीख ४ नोव्हेंबर २०२४ अशी असणार आहे. २० नोव्हेंबरला महाराष्ट्राची निवडणूक एका टप्प्यात होईल. तर २३ नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागेल.

व्होटर ॲपवर मतदार त्यांची माहिती तपासू शकतात. पैसे मद्य ड्रग्जच्या वाटपावर कडक नजर ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व मतदान केंद्र २ किलोमीटरच्या अंतर्गत असेल, मतदान केंद्रावर जाऊ न शकणाऱ्या नागरिकांसाठी घरुन मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यापूर्ण पणे पारदर्शकता बाळगण्यात येईल, अशी माहिती राजीव कुमार यांनी दिली, महाराष्ट्रात ९ कोटी ३ लाख मतदार आहेत. यापैकी ४ कोटी ९३ लाख पुरुष तसेच ४ कोटी ६० लाख महिला मतदार आहेत. एकूण मतदारसंघ २८८ आहेत. त्यापैकी २५ अनुसूचित जाती तर २९ अनुसूचित जमीतीसाठी राखीव आहेत., महाराष्ट्रात १ लाख १५८ मतदार निवडणूक केंद्र आहेत. यापैकी शहरी भागात ४२ हजार ६०४ तर ग्रामीण भागात ५७ हजार ५८२ केंद्र आहेत., झारखंड आणि महाराष्ट्रात भेट घेतली. तिथे राजकीय पक्षांबरोबर इतरांशी चर्चा केली. तसेच निवडणुकीच्या व्यवस्थेची माहिती घेतली. महाराष्ट्रात २८८ मतदारसंघ आहेत. महाराष्ट्राच्या विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर रोजी संपणार आहे., मोठ्या प्रमाणात मतदान केल्याबद्दल जम्मू काश्मीर आणि हरियाणाच्या नागरिकांचं अभिनंदन आणि खूप खूप आभार. दोन्ही राज्याच्या लोकांनी जो उत्साह दाखवला आहे. तो कायमस्वरुपी लक्षात राहील. असे निवडणुक आयुक्त यांनी पत्रकार परिषदेच्या प्रारंभीच सांगीतले.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत ५१ गावाचा समावेश

## आ. बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नांना यश



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर विधानसभा मतदार संघाचे कर्तव्यदक्ष लोकप्रिय विद्यमान आमदार यांच्या विशेष प्रयत्नातून परतुर विधानसभा मतदारसंघातील
मंठा तालुक्यातील शिरपुर, कोकरंबा, तळणी, इंचा, टाकळखोपा, वाघाळा, पोखरी केंधळी, एरंडेश्वर, कोकरसा, तूपा, दहा, जांभरुन, कानडी, देवठाणा, उस्वद, माळेगाव, धोंडी पिंपळगांव, वाई, ब्रम्हनाथ तांडा, मौसा, कठाळा बु., कठाळा खु., गुळखंड तांडाया बाविस गावाचा समावेश करण्यात आला आहे. तर परतूर तालुक्यातील वाघाडी, एदलापुर, खडकी, दहिफळ भोंगाणे, नांद्रा, बाबुलतारा, पिंप्रुळा बु., टाकळी रंगोपंत, गणेशपुर, आंगलगांव, दैठणा खु., श्रीष्टी, दैठणा बु.,पाटोदा माव मावपाटोदा, रायगव्हाण,फुलवाडी, पळशी या अठरा गावाचा समावेश करण्यात आला आहे. या सह परतूर विधानसभा मतदार संघात असलेल्या जालना तालुक्यातील शिवणी तांडा, बाबर पोखरी, नेर, खांबेवाडी, मोहाडी, रामेश्वर,भानुनायक तांडा (सिध्द.), काकडा, शंभू सावरगाव, ढगी, दरेगाव (नेर) या अकरा गावाचा समावेश करण्यात आला आहे. या गावांचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत समावेश करण्यात ऑल गाणे महाराष्ट्र राज्याची माजी मंत्री दत्तापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस त्यांची शेतकरी बांधवांच्या वतीने आभार मानले आहे. सदरील गावाचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत समावेश व्हावा याकरिता आमदार लोणीकर यांनी अनेकदा उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे याबाबतीत पाठपुरावा केला होता.

# समृद्धी कारखान्याकडून एक क्विंटल साखर मोफत!

## समृद्धीचे चेअरमन सतीश घाटगे यांची कामगारांसाठी मोठी घोषणा

**जालना । प्रतिनिधी -** समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी उसतोड कामगार व उस उत्पादक सभासद शेतकरी यांच्या परिवारातील मुला-मुलीच्या लग्नासाठी भव्य मंगल कार्यलय उभारण्याची तसेच शेतकरी सभासदांप्रमाणे उसतोड कामगारांच्या मुलीच्या लग्नासाठी देखील एक क्विंटल साखर मोफत घरपोच करण्याची घोषणा त्यांनी केली. घनसावंगी शहरातील नृसिंह मंगल कार्यालयात सोमवारी ऊसतोड कामगारांचा हा सन्मान व कृतज्ञता सोहळा पार पडला.या सोहळ्यात त्यांनी ही महत्वपूर्ण घोषणा केली. या योजनेचा २० हजार उसतोड कामगारांना लाभ होणार आहे.



समृद्धी साखर कारखान्यामार्फत समाजातील विविध घटकांसाठी विविध हिताच्या अनोख्या योजना राबवत असल्यामुळे समृद्धी कारखाना मराठवाड्यात प्रसिद्ध झाला आहे. २० हजार शेतकरी कुटुंबातील मुलीच्या लग्नासाठी एक क्विंटल साखर मोफत देणारा 'समृद्धी' हा महाराष्ट्रातील पहिला कारखाना आहे. ही योजना आता उसतोड कामगारांच्या मुलीच्या लग्नासाठी देखील त्यांनी सुरु केली आहे. तसेच कामगार व शेतकरी कुटुंबातील मुलीच्या लग्नासाठी भव्य मंगल कार्यालय सतीश घाटगे यांच्या पुढाकारातून उभे राहणार असून कामगार व शेतकरी कुटुंबातील मंगल कार्यासाठी ही वास्तू सर्वांना वापरण्यात येणार आहे. या दोन्ही योजनांचा लाभ २० हजार कामगार व २० हजार शेतकरी अशा ४० हजार कुटुंबाना होणार आहे.

### भावना एकच, आम्ही त्यांचे देणे लागतो

राज्यात अनेक सहकारी आणि खाजगी कारखाने आहेत. परंतु प्रस्थापित कारखानदार कामगाराचा कधी विचार करत नाही. एक कारखानदार म्हणून मी कामगार व शेतकरी वर्गाचे देणे लागतो या भावनेतून समृद्धी कारखाना गरिबांसाठी विविध योजना राबवतो. शेती हा व्यवसाय आहे. त्याला उद्योगाचा दर्जा द्यायचा असेल तर रस्ते, पाणी आणि वीज या गोष्टी आधी पुरवाव्या लागतील. म्हणून माझ व्हिजन आणि मिशन हे समृद्ध शेती आणि मातीच आहे.

**सतीश घाटगे, चेअरमन समृद्धी शुगर्स**



**जालना शहरात बँकेट हॉल येथे मंगळवार (दि १५) रोजी एका कार्यक्रमात उदयोग मंत्री उदय सावंत यांचा सत्कार करताना कालिंका स्टील ग्रुपचे गोपाल गोयल. यावेळी त्यांच्यासमवेत माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर आदी.**



## संपादकीय

# मतदारांचा अधिकार...

गेल्या पंचवार्षिक मध्ये अनेक राजकीय घडामोडी या जनतेने महाराष्ट्रात घडतांना पहिल्या. ऑक्टोबर २०१९ मध्ये निवडणुका जाहीर झाल्या होत्या. त्यानंतर आता पाच वर्षांनी पुन्हा निवडणुका घोषीत झाल्या आहेत. येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार असून त्याचा निकाल २३ नोव्हेंबरला कळणार आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये महाराष्ट्राच्या राजकीय परिस्थतीत बरीच उलथापालथ आपल्याला पहायला मिळाली. गेल्या निवडणुकीत भाजपाला १०५ जागांवर विजय मिळविता आला होता तर शिवसेनेने ५६ जागा जिंकल्या होत्या. असे असतांनाही शिवसेना भाजपा युतीत वादाची ठिणगी पडली आणि त्यानंतर भाजपाने राष्ट्रवादीच्या साथीने देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यातही राष्ट्रवादीचे फुटून गेलेले आमदार शरद पवारांनी दीड दिवसात माघारी बोलावले. अजित पवारांसह सर्वांनीच वापसी केल्यामुळे देवेंद्र फडणवीसांचे स्वप्न भंगले. नंतर शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसची महाविकास आघाडी उदयास आली. यात शरद पवार आणि संजय राऊत यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. महाविकास आघाडीचे नेते म्हणून उद्धव ठाकरे यांच्या गळ्यात मुख्यमंत्री पदाची माळ पडली. मुख्यमंत्री पदाची शपथेनंतर राज्यात कोरोना आजाराने डोके वर काढले होते. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यानंतर अवघ्या दोन-तीन महिन्यांनंतरच राज्यात लॉकडाऊन लागू झाला. घरी बसून काम करण्याची नवीन पद्धत देशभरात नव्हे तर जगाने अनुभवली. त्यानंतर तब्बल दोन-अडीच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होत असतांनाच शिवसेनेत मोठे बंड झाले. एकनाथ शिंदे यांनी काही समर्थक आमदारांना घेऊन शिवसेनेच्या बाहेर पडले. केवळ बाहेरच पडले नाहीत तर शिवसेनेवरच त्यांना दावा केला. त्याच्या समवेत ४० च्यावर आमदारांनी शिवसेनेची साथ सोडली. त्यांना १३ खासदारांनीही साथ दिली. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर युती केल्यामुळे एकनाथ शिंदे नाराज असल्याने त्यांनी हे बंड करत शिवसेनेवर दावा ठोकला. भाजपानेही एकनाथ शिंदे यांना १०५ आमदारांचे बळ देत मुख्यमंत्री केले. या मंत्रीमंडळात देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाले. त्यावेळी त्यांची नाराजी दिसून येत होती. मात्र त्यांनी ती जाहीर करणे टाळले. त्यानंतर लागलीच महिना-दीड महिन्यात शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसही फुटले येथे अजित पवार यांनी बंडखोरी करत करत ४१ आमदारांसह युतीत सहभागी झाले. त्यानंतर ही महायुती झाली. अजित पवार यांनीही एकनाथ शिंदे यांचा कित्ता गिरवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर दावा केला. त्यानंतर गेली अडीच वर्षे मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस व अजित पवार यांनी कार्यकाळ पुर्ण केला. गेल्या पाच वर्षात आत्तापर्यंत झालेल्या राजकीय फोडाफोडी या महाराष्ट्रातील जनतेने जवळून पाहिल्या आहेत. एकानंतर एक राजकीय भुकंप या महाराष्ट्राच्या मातीत घडले जे राज्याने कधी नाही पाहिले ते गेल्या पाच वर्षांतल्या राजकारण आणि राजकारण्यांनी दाखवले. आरक्षणाच्या मुद्यांवरुनही बरेच राजकारण झाले. मराठा आरक्षणाचा मुद्दा अद्यापही प्रलंबित आहे. मराठा आरक्षणाची मागणी करणारे मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्याकडे या सरकारने दुर्लक्ष केल्याचा जरांगे यांचा आरोप आहे. यावेळी पाडापाडी करायची, कुणाला निवडून आणायचे, कुणाला पाडायचे याबद्दल ते स्वतः आचार संहिता लागल्यानंतर सांगणार असल्याचे नुकत्याच झालेल्या दसरा मेळाव्यात सांगितले होते. त्यामुळे जरांगेंच्या भुमिकेवरही राजकीय परिस्थिती काहीशी अवलंबून आहे. आणि जे चित्र मागच्या पाच वर्षांत पहायला मिळाले ते चित्र राज्यातील जनतेच्या मनात कोरल्या गेलेले आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत जनता नेमके कुणाला नाकारणार आणि कुणाला स्विकारणार हे येणारा काळ म्हणजेच २३ नोव्हेंबरलाच स्पष्ट होणार आहे.

# कोजागरी पौर्णिमा (शरद पौर्णिमा)

कोजागरी पौर्णिमेच्या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वाधिक जवळ असतो. या दिवशी रात्री लक्ष्मी आणि इंद्र यांची पूजा केली जाते. मध्यरात्री लक्ष्मी पृथ्वीतलावर येऊन जो जागा आहे, त्याला धनधान्य आणि समृद्धी प्रदान करते, अशी कथा आहे. या दिवसाचे महत्त्व आणि पूजाविधी सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून समजून घेऊया.

तिथी : कोजागरी पौर्णिमा हा उत्सव आश्विन पौर्णिमा या तिथीला साजरा करतात.

इतिहास : या दिवशी भगवान श्रीकृष्णाने व्रजमंडळात रासोत्सव साजरा केला, असे श्रीमद्भागवतात म्हटले आहे.

महत्त्व : अ. वर्षातील या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वांत जवळ असतो आणि त्यामुळे तो मोठा दिसतो. मूळ चंद्रतत्त्वाचे म्हणजे 'चंद्रमा'चे प्रतिनिधित्व करणारा आणि आपल्याला दिसणारा चंद्र 'चंद्रमा'प्रमाणेच शीतल आणि आल्हाददायक आहे. साधकांना चंद्रासारखी शीतलता ईश्वराच्या अवतारांपासून अनुभवता येते, म्हणूनच रामचंद्र, कृष्णचंद्र अशीही नावे राम-कृष्णांना दिली गेली. चंद्राच्या या गुणांमुळेच 'नक्षत्राणामहं शशी' म्हणजे 'नक्षत्रांमध्ये मी चंद्र आहे', असे भगवान श्रीकृष्णाने श्रीमद्भगवद्गीतेत (१०:२१) सांगितले आहे.

आ. मध्यरात्री श्री लक्ष्मी चंद्रमंडलातून भूतलावर येऊन 'को जागर्ति' म्हणजे 'कोण जागे आहे ?', असे विचारून जो जागा असेल, त्याला धनधान्याने संतुष्ट करते.

इ. या दिवशी ब्रह्मांडात आदिशक्ती रूपी धारणेतील श्री लक्ष्मी रुपी इच्छाशक्तीची स्पंदने कार्यरत असतात. या दिवशी धनसंचयाविषयी असलेल्या सकाम विचारधारणा पूर्णत्वाला जातात. या धारणेच्या स्पर्शाने स्थूलदेह, तसेच मनोदेह यांची शुद्धी होण्यास साहाय्य होऊन मनाला प्रसन्नधारणा प्राप्त होते. या दिवशी कार्याला विशेष असे धनसंचयात्मक कार्यकारी बल प्राप्त होते.

ई. या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वांत जवळ, म्हणजे कोजागरी पर्वतालगत आलेला असतो. त्यामुळे या पौर्णिमेला 'कोजागरी पौर्णिमा' म्हटले जाते.




उत्सव साजरा करण्याची पद्धत : 'या दिवशी नवान्न (नवीन पिकवलेल्या धान्याने) जेवण करतात. श्री लक्ष्मी आणि ऐरावतावर बसलेला इंद्र यांची रात्री पूजा करतात. पूजा झाल्यावर पोहे आणि नारळाचे पाणी देव आणि पितर यांना समर्पून नंतर नैवेद्य म्हणून ग्रहण करतात आणि मग आपल्याकडे आलेल्या सर्वांना देतात. शरद ऋतूतल्या पौर्णिमेच्या स्वच्छ चांदण्यात दूध आटवून चंद्राला आटीव दुधाचा नैवेद्य दाखवतात आणि नंतर नैवेद्य म्हणून ते दूध ग्रहण करतात. चंद्राच्या प्रकाशात एकप्रकारची आयुर्वेदिक शक्ती आहे. त्यामुळे हे दूध आरोग्यदायी आहे. या रात्री जागरण करतात. करमणुकीसाठी निरनिराळे बैठे खेळ खेळतात. दुसर्या दिवशी सकाळी पूजेचे पारणे करतात.

कोजागरी पौर्णिमेच्या दिवशी लक्ष्मी आणि इंद्र यांचे पूजन करण्याची कारणे :अ. या दोन देवतांना पृथ्वीवर तत्त्वरूपाने अवतरण्यासाठी चंद्र आग्रहात्मक आवाहन करतो.

आ. लक्ष्मी ही आल्हाददायक आणि इंद्र ही शीतलतादायक देवता आहे. यादिवशी वातावरणात या दोन देवता तत्त्वरूपाने येत असल्याने आणि त्यांचे तत्त्व अधिक प्रमाणात कार्यरत असल्याने त्यांची पूजा केली जाते

लक्ष्मी आणि इंद्र यांचा पूजाविधी :अ. लक्ष्मी आणि इंद्र यांच्या पूजेत पोहे आणि नारळाचे पाणी वापरतात. पोहे हे आनंद देणारे, तर नारळाचे पाणी हे शीतलता प्रदान करणारे आहे. त्यामुळे हे दोन घटक वापरून जीव स्वतःकडे आनंद आणि शीतलता यांच्या लहरी आकर्षित करत असतो.

आ. चंद्राला आटीव दुधाचा नैवेद्य दाखवतात; कारण या दिवशी दुधात चंद्राचे प्रतिबिंब पाहिल्याने त्यातून प्रक्षेपित होणारे चंद्रतत्त्व आपल्याला मिळते. या दुधात स्थूल आणि सूक्ष्म रूपांतून चंद्राचे रूप अन् तत्त्व आकर्षित झालेले असते.

इ. जागरण : मध्यरात्री लक्ष्मी चंद्रमंडलातून भूतलावर येते आणि जो जागा असेल, त्याच्यावर संतुष्ट होऊन त्याला कृपाशीर्वाद देऊन जाते. त्यामुळे कोजागरीच्या रात्री जागरण केले जाते.

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**

**संपर्क- ९२८४०२७१८०**

# अन्नाची नासाडी; सामाजिक गुन्हा

१६ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक अन्न दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरात विविध दिन उत्साहात साजरे केले जातात. त्यापैकी अन्न दिन महत्वाचा मानावा लागेल, कारण त्याचा थेट मानवी जीवनाच्या आस्तित्वाशी संबंध आहे. अन्न सुरक्षेबाबतची एकंदर परिस्थिती पाहता अन्न दिनाबाबत जागरूकता वाढीस लागण्याची गरज आहे. परंतु आजही आपण अन्न सुरक्षेबाबत आणि




अन्नाच्या नासाडी बाबत गंभीर नाहीत असेच म्हणावे लागेल.

अन्न हे पूर्णब्रह्म आहे अशी आपली संस्कृती सांगते पण ही संस्कृती आपण विसरत चाललो आहे की काय असा प्रश्न पडावा असा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. संयुक्त राष्ट्रे पर्यावरण कार्यक्रम आणि भागीदार संस्था डब्ल्यूआरएपी चा अहवालानुसार आपल्या देशात दरवर्षी ६८ दशलक्ष टन धान्याची नासाडी केली जाते. यातील ६१ टक्के अन्न घरातून, २६ टक्के अन्न सेवांमधून तर १३ टक्के अन्न किरकोळ क्षेत्रात वाया जाते. भारतासारख्या कृषिप्रधान देशात इतक्या मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाणे ही भूषणावह बाब नाही. भारतासारख्या विकसनशील देशात जिथे दररोज साठ टक्के लोक उपाशी किंवा अर्धपोटी झोपतात तिथे अन्नाची अशी नासाडी परवडणारी नाही. वाया जाणारे हे अन्न जर गोरगरिबांच्या, भुकेल्यांच्या मुखात पडले तर देशात कोणीही उपाशी झोपणार नाही पण आपल्याला आपल्या संस्कृतीचा विसर पडत चालला आहे. आपल्याला हवे तेवढेच अन्न पानात काढून घ्यायचे आणि तेवढेच खायचे अशी आपली परंपरा आहे. खाऊन माजावे पण फेकून माजू नये अशी आपली आजी सांगायची हेही आपण विसरून गेलो आहोत. पाश्चात्य देशात हॉटेलातही पानातले अन्न टाकणे हा सामाजिक गुन्हा मानला जातो. भुकेने व्याकुळ झालेल्या लोकांची आठवणही अन्न टाकून देणाऱ्या या सोकावलेल्या श्रीमंतांना येत नाही. अन्नाची नासाडी हा सामाजिक गुन्हा आहे याचे भान अन्न टाकून देणाऱ्या श्रीमंतांना राहिले. नाही. पोटातील भुकेची आग भागवण्यासाठी देशातील कोट्यवधी लोक भीक मागतात. आदिवासी, दुर्गम भागात आजही लाखो लोक पुरेसे अन्न मिळत नाही म्हणून कुपोषित आहेत तर दुसरीकडे दररोज लाखो टन अन्न फेकून दिले जाते ही विसंगती बदलायला हवी. वाया जाणारे हे अन्न गोरगरिबांच्या मुखात पडेल अशी व्यवस्था असायला हवी. हैदराबाद, चेन्नई, दिल्ली, कोलकाता, मुंबई, बंगळुरु यासारख्या मोठ्या शहरात हॉटेल, रेस्टॉरंट, घरात उरलेले अन्न गरिबांना मिळावे यासाठी कम्युनिटी किचन ही संकल्पना अमलात आणली गेली. या संकल्पनेनुसार शहरातल्या विविध भागातल्या रस्त्यावरच्या कम्युनिटी किचन च्या केंद्रातल्या मोठ्या फ्रीजमध्ये उरलेले अन्न ठेवले जाते. भुलेल्यांनी ते काढून घ्यावे अशी सुविधा या केंद्रात आहे पण ही संकल्पना शहरातील मोठ्या शहरातच आहे, ती ही व्यापक नाही. कम्युनिटी किचन सारखी संकल्पना प्रत्येक शहरात व्यापक स्वरूपात राबवायला हवी म्हणजे वाया जाणारे अन्न भुलेल्यांच्या मुखात जाईल आणि अन्नाची नासाडीही थांबेल.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

शिवसेना दलित आघाडीच्या मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद

# वाड्या-वस्त्यांवरील गोर-गरीबांची साद



**घनसावंगी । प्रतिनिधी -** भुमिहिन,कास्तकार, बेघरांसाठी अहोरात्र शासन व प्रशासनाशी मी झगडत असून वेळप्रसंगी न्यायालयातही मी भुमिहिनांसाठी खटले चालवित आहे. या आपल्या लढ्याला यश आले असून लवकरच आपल्या पदरी सातबारा उतारा पडेल, असेही शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख तथा भुमिहिन,कास्तकारांचे नेते ॲड. भास्कर मगरे म्हणाले. घनसावंगी येथील आयोजित करण्यात आलेल्या दलित आदिवासी भूमीहीन बेघर,निराधार मेळाव्यात संवाद साधतांना बोलताना होते. यावेळी तांडे,वाड्या, वस्त्यांमधून मोठ्या संख्येने भुमिहिन, कास्तकार, बेघरांसह विविध योजनेपासून वंचित असलेले नागरिक व महिलांची उपस्थिती होती.

आपण शिवसेना दलित आघाडीच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून रस्त्यावरची लढाई लढत आहोत. आपण कुठल्याही प्रकारे माघार घेतलेली नाही, प्रशासन, शासन दिलेल्या आदेशाची अंमलबवणी करत नसल्याने आपल्या सारख्या सर्वसामान्यांचा प्रशासनातील अधिकारी व कर्मचार्यांवर प्रचंड रोष आहे. परंतु आपल्या लढाई रास्ता असून आपण ती पुर्णपणे जिंकणार असून लवकरच आपल्या पदरी सातबारा नक्कीच मिळेल, अशी ग्वाही शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे यांनी उपस्थितांना दिली.

# वाचनाने मुलांमध्ये चांगले संस्कार होतात- डॉ. सतीशचंद्र प्रभु

**जालना । प्रतिनिधी -** शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय अंगीकारावी कारण वाचनाने चांगले संस्कार होतात असे प्रतिपादन वैज्ञनिक व भारतीय जनता पक्षाच्या बुध्दीजीवी प्रकोष्ठचे जिल्हा संयोजक डॉ. सतीशचंद्र प्रभु यांनी केले.

ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालया येथे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली त्यानिमित्ताने आयोजित तीन दिवसीय स्पर्धा परीक्षा व संस्कृत ग्रंथाच्या ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. सतीशचंद्र प्रभु यांच्या हस्ते करण्यात आले त्याप्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर सानेगुरुजी कथामालेचे तालुकाध्यक्ष पांडुरंग वाजे, ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाचे अध्यक्ष कैलास बियाणी यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम याच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

उद्घाटनपर मनोगत व्यक्त करतांत डॉ. सतीशचंद्र प्रभु म्हणाले कि, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम हे सर्वांमध्ये मिसळत असल्यामुळे ते लोकांचे राष्ट्रपती होते. वाचनालयाच्या माध्यमातून वाचनाची चळवळ चालवत असल्याबद्दल त्यांनी संस्थेचे कौतूक केले. मनोगत व्यक्त करतांना मिलिंद सावंत म्हणाले कि, डिजिटल युगामध्ये नवीन पिढीसाठी वाचनाचे महत्व अधोरेखित करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलामं यांचे अग्निपंख हा ग्रंथ सर्वांनी वाचावे. लक्षणशास्त्री खांडेभराड यांनी मनोगत व्यक्त करताना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची प्रेरणादायी गोष्ट सांगितली. ग्रंथ प्रदर्शन दिनांक १५,१६ व १७ ला सर्वासाठी खुले राहील. नितीन बावणे यांनी वाचन प्रेरणा दिनाचे घोषवाक्य म्हणून घेतले.या प्रंसगी पांडुरंग वाजे यांनी ग्रंथालयाला ४१ ग्रंथ भेट दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी केले तर उपस्थितचे आभार कैलास बियाणी यांनी मानले. याप्रसंगी ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाचे सचिव श्रीकांत शेलगावकर, सुधाकर भालेराव, अशोक बैरागी, पांडुरंग काळे, सखाराम बोरूळ, जगदीश अग्निहोत्री, परमेश्वर नंद, शिल्पा देशपांडे, आशिष उबाळे, प्रतिमेश शेलगावकर, शैलेंद्र बदनापुरकर यासह वाचकवर्ग उपस्थित होता.



# मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतुन एकशे सहा किलोमीटर रस्त्या करीता एकशे चौदा कोटी रुपये मंजूर

आमदार बबनराव लोणीकर यांचे विशेष प्रयत्न

**परतूर । प्रतिनिधी -** माजी मंत्री परतूर विधानसभा मतदार संघाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातुन परतूर विधानसभा मतदारसंघातील परतूर मंठा व जालना तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजना संशोधन व विकास अंतर्गत खालील रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी ५० किलोमीटर डांबरीकरण रस्त्याच्या कामाकरीता ५५ कोटी रुपये तर परतूर विधानसभा मतदारसंघातील ५६ किलोमीटर सिमेंट रस्त्याच्या कामास ५८ कोटी रुपये अशा एकशे चौदा कोटी रुपये रकमेस ग्रामविकास मंत्री माननीय नामदार गिरीशजी महाजन साहेब यांनी मंजुरी दिली आहे. यात खालील डांबरी रस्ते कामाचा समावेश आहे. प्रामुख्याने रामा २२२ ते सावरगाव भागडे- ग्रामा ३६ ता.जि. जालना १.०० किमी, जोडरस्ता शेवगा ता. परतूर जि. जालना ३.०० किमी, जोडरस्ता वरफळवाडी ता. परतूर जि. जालना २.०० किमी, सातोना ते देवला ता. परतूर जि. जालना ३.०० किमी, पाथरी रोड फुलवाडी ते पळसी ता. परतूर जि. जालना ६.०० किमी, खांडवी ते पिंप्रूळा ता. परतूर नि. जालना ४.०० किमी, नेर ते हस्तेपिंपळगाव ता. जालना जि. जालना ५.०० किमी, मंठा ते टोकवाडी तांडा पांगरी खुर्द ते माळकिणी ता. मंठा जि. जालना ७.०० किमी, रामा ६१ अकोली लिखित पिंपरी ते लिंगसा ग्रा मा ३९ इजीमा १३७ ता. परतूर जि. जालना ९.७० किमी, प्रमुख जिल्हा मार्ग ५८ ते माहोरा ता. मंठा जि.जालना २.१० किमी, राम गा-५४८८ ते आनंदगाव ग्रा मा ७५ ता. परतूर जि. जालना ३.०० किमी, नेर ते हस्ते पिंपळगाव इजीमा १६२ ता.जि. जालना ५.८०० किमी, प्रमुख जिल्हा मार्ग १३ ते रामतीर्थ ता. मंठा जि. जालना १.०० किमी १४ राष्ट्रीय जिल्हा मार्ग ५४८ सी कानडी. तर सिमेंट रस्ते कामात रामा २२३ ते पांडेपोखरी रस्ता साडे तीन किलोमीटर ४ कोटी ३० लाख रुपये सातोना ते अंगलगवा रस्ता साडे तीन किलोमीटर ४कोटी ५९ लाख रुपये, आष्टी सातारा वाहेगाव चंदुनाईक तांडा रस्ता साडेपाच किलोमीटर ८ कोटी ४० लाख रुपये, रामा ५४८ सी ते वैजोडा रस्ता साडे तीन किलोमीटर करीता ४ कोटी ८३ लाख रुपये, प्रजिमा १२ ते लावणी तांडा ते अर्जा तोलाजी रस्ता साडे तीन किलोमीटर ४ कोटी ४८ लाख रुपये, रामा ५४८ सी ढोकसाळ ते वाघोडा ते वरुड रस्ता साडे सात किलोमीटर ९ कोटी ५८ लाख रुपये, रामा ७५२ ते लिंबेवडगाव रस्ता पाच किलोमीटर ६ कोटी ५६ लाख रुपये, प्रजिमा १२ ते बेलोरा तांडा ते पोखरी केंधळी रस्ता ३ किलोमीटर ४ कोटी रुपये, रामा २२२ ते ढगी ते बोरगाव रस्ता सहा किलोमीटर ८ कोटी रुपये कामाचा समावेश आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात 'वाचन प्रेरणा दिन' साजरा




**जालना । प्रतिनिधी -** माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस सर्वत्र 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयात 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रवार यांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. वाचन संस्कृती ही प्रत्येक मानवाच्या सोबत वाटचाल करणारी एक महत्वाची प्रक्रिया आहे. वाचन संस्कृतीचा समाजातील दैनंदिन जीवनशैलीशी व एकूणच समाजातील घडामोडींशी जवळचा संबंध येत असतो. किंबहूना वाचन संस्कृती म्हणजे समाज व्यवस्थेचेच महत्वाचे एक रूप आहे. ज्यातून विविध विषयाचे ज्ञान प्राप्त होत असते. वाचनामुळे मानवी मेंदूला व मनाला नवी दिशा व चालना मिळते असे अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रवार यावेळी म्हणाल्या.

उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे म्हणाल्या की, प्रत्येकाने रोज एक तरी पुस्तकाचे वाचन करणे आवश्यक आहे. वाचनामुळे आपल्या ज्ञानात विविध विषयाची भर पडण्यास मदत होते. वाचन प्रेरणा दिनानिमित्त मान्यवरांनी पुस्तकांचे वाचन केले. यावेळी वाचन सामान्य प्रशासनाच्या उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, तहसिलदार सर्वश्री श्रीमती तायडे, श्रीमती मेडके, अनिल नवहाते यांच्यासह विविध विभागातील अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# पयामे इन्सानियतच्या मोफत शिबिरात सहाशे जणांची आरोग्य तपासणी

**जालना । प्रतिनिधी -** ऑल इंडिया पयामे इन्सानियत फोरमचे जालना युनिट आणि जम जम हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १३ ऑक्टोबर रोजी आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात सहाशे जणांची तपासणी करण्यात येऊन औषधीही देण्यात आली.

जुना जालना विभागातील जमजम मल्टीस्पेशोलिटी हॉस्पिटलमध्ये सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत हे मोफत आरोग्य तपासणी शिबिर पार पडले.

शहरातील तज्ज्ञ डॉ. सरदर्शन मांटे, डॉ. सय्यद सैम, डॉ. अनीजा फातिमा, डॉ. सचिन वाघ, डॉ. श्रीराम वानखेडे, डॉ. आरिफ शेख, डॉ. नावेद बागबान, डॉ. इम्रान खान यांनी रक्तदाब, बालकांचे सर्व आजार, त्वचा, छाती विकारासह सर्व विकारांची मोफत तपासणी केली. त्यांना योग्य मार्गदर्शन करून मोफत औषधी देण्यात आली.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी जमजम हॉस्पिटलचे कर्मचारी जहीरभाई, अब्दुल समदभाई पयामे इन्सानियत टीमचे सलीम कच्छी, मुसा मौलाना, अन्सार शेख, जुबेर बावला, मौलाना सय्यद अकील नदवी, सय्यद अहमद, सुफियान मन्सूरी, मुजम्मिल शेख, आझम शेख, आदिल शेख, सय्यद शाहिद, शेख साहिल, सोहेल खान यांनी विशेष परिश्रम घेतले.

झाडे लावा
झाडे जगवा



**माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे स्वीय सहाय्यक राजेश जोशी यांनी मंगळवार (दि १५) रोजी भाजपा जालना जिल्हा कार्यालयात पदभार स्विकारला. यावेळी त्यांचे स्वागत करतांना स्वीय सहाय्यक गोवर्धन कोल्हे, बाबासाहेब कोलते, दत्तु बागल, दत्ता जाधव, राम जाधव, विठ्ठल नरवडे, विष्णु राठोड, सचिन राठोड, शरद अंबले, गजानन खंडागळे आदींची उपस्थिती होती.**

## रिंग रोडमुळे एमआयडीसीत जाण्यास सुकर रस्ता - अर्जुन खोतकर

# खोतकर यांनी केलेल्या मागण्या पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी माझी-उदय सामंत

**जालना । प्रतिनिधी -** रिंग रोडमुळे एमआयडीसीत जाण्यासाठी सुकर रस्ता तयार झाला असून यामुळे सोय झाली असली आम्हाला एमआयडीसीमध्ये अंतर्गत रस्ते हे सिमेंट हवे आहेत, या मागणी बरोबरच श्री. खोतकर यांनी यावेळी मंत्री महोदयांकडे अनेक समस्या मांडल्या. तर श्री. अर्जुन खोतकर यांनी केलेल्या मागण्या पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी माझी असल्याचे राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी यावेळी सांगितले.

यावेळी व्यासपीठावर सोनाली मुळे, अर्जुन गेही, सुरेश अग्रवाल, राजेंद्र भारुका, आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. भक्कड यांनी केले.

यावेळी बोलतांना शिवसेनेचे उपनेते तथा माजी मंत्री अर्जुनराव खोतकर म्हणाले की, जालना ही बियाणाची पंढरी असले तरी या ठिकाणाहून शासनाला बर्याच मोठ्या प्रमाणात महसूल जात आहे. मग तो कोणत्याही रुपात असो. मंत्री महोदयांकडे निर्देश करुन श्री. खोतकर म्हणाले की, याठिकाणी बसलेले सामान्य वाटत असले तरी ते सामान्य नाहीत तर अगदी सर्वसामान्य आहेत, असे वाटत असले तरी प्रत्येक जण जवळपास पाच हजार लोकांना रोजगार उपलब्ध करुन देणारे आहेत. जालना ही बियाणांची पंढरी असली तरी या ठिकाणच्या व्यापार्यांनी अगदी मेहनतीने आप- आपले उद्योग उभारुन ते सांभाळले आहेत. राज्यात जालन्यातून विविध प्रकारचा कर भरणारे लोकं याठिकाणी आहेत. म्हणून त्यांच्या अडीअडचणी सोडण्यासाठी आपण निश्चितच प्रयत्न कराल, असे सांगून श्री. खोतकर म्हणाले की, एमआयडीसीला रिंग रोड देण्याचा आपला प्रयत्न यशस्वी राहिला आहे. मग त्यासाठी आपल्याला अनेकवार दिल्ली आणि भोपाळला जावे लागले. या वळण रस्त्यामुळे एमआयडीसीत कोणत्या जायचे असेल तर आपण जाऊ शकतो. परंतू आम्हाला या ठिकाणी डांबरी रस्ते नको तर सिमेंटचे रस्ते हवे आहेत. डांबरी रस्ते लवकर खराब होतात, असे सांगून श्री. खोतकर यांनी या ठिकाणी उद्योग भवन उभारण्याची मागणीही केली. त्यांचबरोबर येथील उद्योजकांना सवलतीच्या दरात वीज उपलब्ध झाली पाहिजे. अशी त्यांची मागणी आहे. सोलारसाठी दोनशे-तीनशे एक्करचा परिसर देण्याची तयारी त्यांची आहे. परंतू ती वीज त्यांनाच मिळाली पाहिजे. त्यासाठी देखील आपण प्रयत्न करावा, अशी विनंतीही श्री खोतकर यांनी उद्योग मंत्र्यांकडे केली. सुरेशभाऊंकडे दोन हजार रंगाच्या मिरच्या आहेत. त्यांनी कृषी प्रदर्शन भरवले तेव्हा मुख्यमंत्री म्हणाले होते, तुमच्याकडे एवढ्या प्रकारच्या मिरच्या आहेत, परंतू भगव्या रंगाची मिरची यात का नाही? त्यावेळी सुरेश भाऊ म्हणाले की, तुम्ही पुढच्या वर्षी या तुम्हाला भगव्या रंगाची मिरची सुध्दा दिसेल. आणि त्यांनी खरोखरच भगव्या रंगाची मिरची सुध्दा काढलीच, असे खोतकर म्हणताच सभागृहात एकच हशा पिकला. त्यानंतर त्यांनी नांदेड समृध्दी महामार्गाचा उल्लेख केला. ते म्हणाले की, हा महामार्ग येथून जात आहेत. याचा आंनंद आहेच. परंतू शेतकर्यांचे काही प्रश्न आहेत. ते सोडवणेही गरजेचे आहे. त्यावेळी अधिकार्यांनी



इन कॅमेरा चौकशी केली, पाहणी केली. त्यातील काही अधिकारी आता नाहीत परंतू इन कॅमेरा पाहणी करुनही शेतकर्यांचे प्रश्न सुटत नसतील तर त्याला म्हणार! यावेळी बोलतांना उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले की, आचार संहिता ही आमच्यासाठी आहे, अधिकार्यांसाठी नाही, त्यामुळे येथील उद्योजकांचे कोणतेही काम अडणार नाही. आपण आत्ताच तशा सूचना अधिकार्यांना दिल्या आहेत, असे सांगून श्री. सामंत म्हणाले की, श्री. अर्जुन खोतकर यांनी केलेल्या सर्व मागण्या मार्गी लागल्या असे समजा! आपली प्रमुख मागणी ही विजेचे आहे! परंतू आम्ही आपल्याला पस्तीस टक्के सबसिडी देतो तेव्हाच ती विज तुम्हाला तीन रुपये या दराने मिळते, फक्त कागदावर दिसत नाही, एवढाच काय तो फरक आहे. वीजेचा प्रश्न अनेकांना गंभीर वाटत असला तरी तो इतका गंभीर आहे, असे मला तरी वाटत नाही, हे महायुतीचे सरकार म्हणजे उद्योजकांचे सरकार आहे, असे श्री. सामंत म्हणाले. याप्रसंगी कालिका स्टीलचे गोपाल गोयल तसेच अभिमन्यू खोतकर, संजयभाऊ खोतकर, भाऊसाहेब घुगे आदींसह लघु उद्योग भारतीचे सभासद, स्टील असोसिएशनचे पदाधिकारी, मोंढ्यातील व्यापारी आणि शिवसेनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

# रोटरी रेनबोने नवरात्रोत्सवात राबविलेल्या अभियानात ७५ पोती प्लास्टिकचे संकलन

**जालना । प्रतिनिधी -** दुर्गा माता नवरात्रोत्सवात रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोने जालना महानगरपालिकेच्या सहकार्याने ९ दिवस प्लास्टिक संकलन अभियान राबविले. या माध्यमातून ७५ पोती प्लास्टिक संकलन करण्यात करण्यात येऊन, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

नवरात्रोत्सवात जालना येथे दुर्गा माता मंदिर परिसरात मोठी यात्रा भरते. त्यात अनेक छोटी- मोठी दुकाने लागतात. सर्व स्टॉलधारक दुकानदारांना प्लास्टिक रस्त्यावर फेकून न देता वेगळे साठवून ठेवण्याच्या सूचना क्लबतर्फे देण्यात आल्या होत्या. ९ दिवसीय या अभियानात ७५ पोती प्लास्टिक संकलित करण्यात आले. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी क्लबच्या सदस्या डॉ. प्रतिभा श्रीपत यांनी विशेष परिश्रम घेतले. सोबतच यात्रेच्या



ठिकाणी दर्शनास येणाऱ्या भाविकांसाठी दोन दिवशीय मधुमेह निदान शिबिर घेण्यात आले. त्यात रोटरी इंटरनॅशनलचे डिस्ट्रिक्ट डायबिटीज डायरेक्टर डॉ. राजेश सेठीया आणि त्यांच्या टीमने ५७० जणांची तपासणी करून मार्गदर्शन केले. यावेळी क्लबचे अध्यक्ष महेश माळी, सचिव गौरव करवा यांच्यासह जयेश पहाडे, पंकज लड्डा, गोपाल मुंदडा, संजय काबरा, कल्पेश भक्कड, संतोष तिवारी, विवेक मणियार आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉल्फिन इंग्लिश स्कूल येथे माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यातील वाटुर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये दि.१५/१०/२०२४, रोजी भारताचे माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली आहे.भारताचे मिसाईल मॅन म्हणून ओळख असणारे ए पी जेअब्दुल कलाम यांच्या विषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.काही विद्यार्थ्यांनी या थोर शास्त्रज्ञाच्या जीवनावर आपले विचार मांडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका श्रीमती सय्यद नसरीन. श्रीमती पाटील भाग्यश्री. श्रीमती उबाळे वंदना. श्रीमती वायळ शारदा. शेळके गजानन यांनी मेहनत घेतली आहे.

## भाजपा युवा मोर्चाच्या मंठा शहराध्यक्षपदी दीपक बोराडे यांची नियुक्ती

# आ. लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत मंठ्यात तरुणांचा भाजपात प्रवेश

**मंठा । प्रतिनिधी -** भारतीय जनता पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना त्रास देऊन मानसिक खच्चीकरण करण्याचा प्रयत्न मंठा तालुक्यात होत असून. माझ्या कुठल्याही कार्यकर्त्याला झालेला त्रास मी अजिबात सहन करणार नाही. विकासाच्या मुद्द्यावर आपण येणारी विधानसभा निवडणूक लढवत असून गुद्द्यावर येण्याची भाषा कोणीही करू नये वेळप्रसंगी जशास तसे उत्तर देऊ असा खणखणीत इशारा महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला. काल मंठा शहरात भारतीय



जनता पार्टीतर्फे आयोजित पक्षप्रवेश सोहळ्याप्रसंगी उपस्थित भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. गावगाड्यातील खेड्यापाड्यातील सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान उंचाव शहरी व ग्रामीण भागासह तांडी वाड्यावर त्याचा सर्वांगीण विकास व्हावा सर्वसामान्य शेतकरी गोरगरीब वंचित पीडित विस्थापितांना त्यांची न्याय व हक्क मिळावा याकरिता गेली ४० वर्ष सतत अविरत संघर्ष करणारे लोकप्रिय लोकनेते महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वात मंठा तालुक्यातील शेकडो तरुणांनी काल दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी सोमवारी सायंकाळी सात वाजता भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा चे मंठा शहराचे नव नियुक्त शहराध्यक्ष दीपक बोराडे आणी भाजपा युवा मोर्चा चे मंठा तालुका अध्यक्ष विलास घोडके यांच्या पुढाकाराने आमदार बबनराव लोणीकर व भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल बबनराव लोणीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पवन बोराडे , निखिल बोराडे, प्रदीप बोराडे, सुरेश घनवट, महेश बोराडे, विजय बोराडे, राजेश बोराडे, राम बोराडे, शाम बोराडे, सुदर्शन बोराडे, करण बोराडे, अर्जुन बोराडे, योगेश बोराडे, नवनाथ बोराडे, सिधू बोराडे, नागेश बोराडे, भागवत बोराडे, अभिजित बोराडे, विजय बोराडे, वैजनाथ बोराडे, राहुल बोराडे, अजय बोराडे, रुद्र बोराडे, गजानन बोराडे, संभाजी बोराडे, विकास बोराडे, रईस कुरेशी, गौस कुरेशी, इरफान कुरेशी, सिद्दिक कुरेशी, नावेद कुरेशी, अफरोज कुरेशी, फैसान कुरेशी, नायब कुरेशी, कयुम कुरेशी, सोहेल बागबान, मजर कुरेशी, उबेर कुरेशी, जूबेर अल्ताफ कुरेशी, शाहरुख कुरेशी, समद कुरेशी, जावेद कुरेशी, मोबिन कुरेशी, साजिद कुरेशी, मुजमिल कुरेशी, अबुजर कुरेशी, कलीम कुरेशी, आदी असंख्य तरुणांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.